पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७८**

**सभावृत्तांत**

दिनांक – **१४/०७/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **१४/०७/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.गायकवाड संध्या सुरदास
३) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
४) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५) मा.तरस बाळासाहेब जयवंत
६) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७) मा.प्रसाद शेट्टी
८) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
९) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
१०) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
११) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१२) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१३) मा.काळे विमल रमेश
१४) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१५) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.भोसले-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त,मा.चव्हाण,मा.तुपे–सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.खांडकेकर,मा.दंडवते,मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.कपिले, मा.थोरात,मा.लडकत,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.केदारी,मा.कांबळे,मा.ओंभासे, मा.गट्टूवार,मा.शेख-कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी, मा.बेंडे-प्रशासन अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.प्रसाद शेट्टी                                        अनुमोदक – मा.सविता साळुंके

दि.१४.०७.२०१५ ची मा.स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २१/०७/२०१५ रोजी सकाळी १०.४५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

**मा.सभापती** - दि.१४.०७.२०१५ ची मा.स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २१/०७/२०१५ रोजी सकाळी १०.४५ वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७८**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १४.०७.२०१५ ची तहकूब सभा)**

दिनांक – **२१/०७/२०१५** वेळ – **सकाळी १०.४५ वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.१४.०७.२०१५ची तहकूब सभा मंगळवार, दिनांक **२१/०७/२०१५** रोजी सकाळी **१०.४५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
११) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१२) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१३) मा.काळे विमल रमेश

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे–सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.दंडवते,मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.दांगट, मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.रत्नपारखी,मा.गलबले,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी,मा.बोदाडे,मा.बेंडे-प्रशासन अधिकारी,मा.लावंड-कायदा अधिकारी,मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

दिनांक ७/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – ११९८५ विषय क्रमांक – १
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/५६५/१४ दि.०९/१२/२०१४
विषय - ड प्रभागांतर्गत प्र.क्र.५३, ५९ व ६० मधील अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकामी हायराईज बूम पोकलेन व तत्सम यंत्रसामुग्री भाडेतत्वावर पुरविणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार दिनांक २५/०८/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९८६ विषय क्रमांक – २
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – उद्यान
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२३३/१५ दि.१३/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१४/२०१४-१५ मधील बाब क्र. ६ अन्वये, आई उद्यान देखभाल व संरक्षण करणेकामी मे.कोमल एंटरप्रायजेस (निविदा रक्कम रुपये १७,८९,३९२/- (अक्षरी र.रु. सतरा लाख एकोणनव्वद हजार तीनशे ब्याण्णव फक्त) पेक्षा ४२.७७% कमी) दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये १०,२४,०६९/- प्रमाणे काम करुन घेणेस तसेच निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९८७ विषय क्रमांक – ३
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-३/कावि/४९०/१५ दि.१६/३/२०१५
विषय - मानसेवी पी.जी.टिचर्सच्या नेमणुकीबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९८८ विषय क्रमांक – ४
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/२९/२०१५ दि.१५/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.इ मुख्यालय/HO/४५/१/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.७ च-होली दर्गा ते पठारेमळा २४ मी. रस्त्यावर कलवर्ट बांधणेकामी मे.एस.डी. दौडकर (नि.र.रु.५६,०४,३५७/- (अक्षरी र.रू.छपन्न लाख चार हजार तीनशे सत्तावन्न) पेक्षा ३६.९९% कमी) या

ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३७,०७,८७१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९८९ विषय क्रमांक – ५

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/५५/२०१५ दि.११/०६/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली पुणे आळंदी रस्ता ते खाणीचा रस्ता डांबरी करणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९९० विषय क्रमांक – ६

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक-मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक-मा.शांताराम भालेकर

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/५४९/२०१५ दि.१६/६/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाह्य परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाव्दारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे कामकाजास मुदतवाढीबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९९१ विषय क्रमांक – ७

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/१४४/१५ दि.१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३९/२०१४-१५ मधील अ.क्र.६ अन्वये, ड प्रभागाअंतर्गत अतिक्रमण विरोधी कारवाईसाठी ट्रक, क्रेन, जे.सी.बी. इत्यादी भाडेतत्वावर पुरविणेकामी मे.शिवम एंटरप्रायजेस, महादेव पंढरीनाथ वाघेले (नि.र.रु. ३२,६७,८८९/- (अक्षरी र.रू.बतीस लाख सदुसष्ट हजार आठशे एकोणनव्वद) पेक्षा ४३.२०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १९,४८,९६९/- पर्यंत काम करून घेणेस त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९९२ विषय क्रमांक – ८

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१५२/१५ दि.०१/७/२०१५

विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते म्हाळसाकांत चौकापर्यंतचा रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९९३ विषय क्रमांक – ९

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/०६/कावि/१९१/२०१५ दि.०२/०७/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाचे इ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक छपाई करणेबाबत ऑनलाईन प्रसिद्ध केलेल्या कोटेशन नोटीस क्र.१/२०१४-१५ नुसार मे.आभिषेक ग्राफिक्स, चिंचवड, पुणे-३३. यांचे दर र.रु.६४०/- लघुत्तम असल्याने त्यांचे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. मे.आभिषेक ग्राफिक्स, चिंचवड. यांना सदरचे अंदाजपत्रक छपाई करुन देणेबाबत पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असलेने, सदर संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११९९४ विषय क्रमांक – १०

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/३८०/२०१५ दि.७/७/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१५-२०१६ अन्वये, क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील पावसाळी गटर्स चेंबर्स खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करून मोशी कचरा डेपोत खाली करून पसरून देणेकामी मे.जनसेवा स्वयंरोजगार सेवा सह. संस्था (नि.र.रू.२,१६,९३६/- (अक्षरी र.रू.दोन लाख सोळा हजार नऊशे छत्तीस) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात येणार असल्याने क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील पावसाळी गटर्स चेंबर्स स्ट्रॉर्म वॉटर साफसफाई करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११९९५ विषय क्रमांक – ११

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/५६६/२०१५ दि.८/७/२०१५

विषय - मनपाचे विविध विभागाकरिता आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११९९६ विषय क्रमांक – १२

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक-मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२७४/२०१५ दि.०८/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.१६ अन्वये, जलक्षेत्र क्र.ड/१ वाकड मध्ये नव्याने विकसीत होणा-या भागातील पाणीपुरवठा नलिका टाकणेकामी मे.श्री कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू. १४,०१,१७२/- (अक्षरी र.रू. चौदा लाख एक हजार एकशे बहात्तर फक्त) पेक्षा २१.७७% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.११,५०,९४३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११९९७ विषय क्रमांक – १३

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२७५/२०१५ दि.०८/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील निविदा क्र.१६/२/२०१४-१५ साठी प्राप्त झालेल्या ०३ निविंदापैकी मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन या ठेकेदाराची स्टेबल ब्लिचिंग पावडर (TCL) Grade - 1 ( IS 1065/1989 ) खरेदी करणेकामी र.रु.१८,४००/- प्रती मे.टन दराची निविदा आलेली असल्याने व तुलनात्मक दृष्ट्या वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचा विषयांकित कामासाठी र.रु.१८,४००/- प्रती मे. टन दराने (एकुण अपेक्षित खर्च र.रु.१८,४०,०००/-) निविदा स्विकृतीस मा.आयुक्त यांनी दि.०२/०६/२०१५ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११९९८ विषय क्रमांक – १४

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२७७/२०१५ दि.०८/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१३/१९/२०१४-१५ मधील अ.क्र.१५ अन्वये, पिंपळे निलख पाण्याच्या टाकीचे रंग सफेदी करणे व स्थापत्य विषयक व सुशोभीकरणाची कामे करणेकामी मे.श्री साईकृपा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१६,८०,८७६/- (अक्षरी र.रू. सोळा लाख ऐंशी हजार आठशे श्याहत्तर फक्त) पेक्षा २९.५९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१२,४२,६८०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११९९९ विषय क्रमांक – १५

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२७६/२०१५ दि.०८/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१३/१९/२०१४-१५ मधील अ.क्र.१९ अन्वये, पिंपळे गुरव पाण्याच्या टाकीचे रंगसफेदी करणे व स्थापत्य विषयक व सुशोभीकरणाची कामे करणेकामी मे.श्री साईकृपा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१०,४९,६८४/- (अक्षरी र.रू.दहा लाख एकोणपन्नास हजार सहाशे चौऱ्याऐंशी फक्त) पेक्षा २९.५९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७,७६,०३६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२००० विषय क्रमांक – १६

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – दुरसंचार विद्युत

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.दुरसंचार/१/कावि/१७४/२०१५ दि.०८/०७/२०१५

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मार्फत विविध कार्यालये, नगरसदस्य, अधिकारी, व कर्मचारी यांस मोबाईल सिम सुविधा पुरविणेत येते. याबाबत नुकतेच निवीदा नोटीस क्र.१२/५-२०१४/१५ व मा.स्थायी समिती ठराव क्र. १११३३ दिनांक-२४/०३/२०१५ अन्वये मान्यता मिळाली असुन मे.आयडिया सेल्युलर लि. यांस कामाचा

आदेश क्र. वि/मुका/४/कावि/६०/१५ दिनांक- १५/०६/२०१५ देणेत आलेला आहे. खालील अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल सिम सुविधा देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी नांव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| १ | डॉ.मनिषा अश्विनीकुमार सपाटे | भुलतज्ञ वर्ग १ | वाय.सी.एम.रुग्णालय |
| २ | डॉ.विद्याधर बबन फल्ले | वैद्यकिय अधिकारी | तालेरा रूग्णालय |
| ३ | श्री. प्रताप किसनराव मोरे | कनिष्ठ अभियंता (स्था.) | अ क्षेत्रिय कार्यालय |
| ४ | श्री.राहूल तिपन्ना जन्नु | कनिष्ठ अभियंता (स्था.) | जलनिःसारण |
| ५ | श्री.योगेश सोपान आल्हाट | कनिष्ठ अभियंता (स्था.) | जलनिःसारण |
| ६ | श्री.कलाल इम्रान कयुम | कनिष्ठ अभियंता (स्था.) | ड क्षेत्रिय कार्यालय |
| ७ | श्री.शेलार अमोल बाळासाहेब | कनिष्ठ अभियंता (स्था.) | जलनिःसारण |
| ८ | श्रीम.राऊत वर्षा रमेश | कनिष्ठ अभियंता (स्था.) | ड क्षेत्रिय कार्यालय |
| ९ | श्री.देवरे महेंद्र केदारेश्वर | कनिष्ठ अभियंता (स्था.) | क क्षेत्रिय कार्यालय |
| १० | श्री.बने पी. एस. | स्विय सहा. मा. महापौर | नगरसचिव |
| ११ | श्री.वाधवानी डी.एल. | आरोग्य निरीक्षक | अ क्षेत्रिय कार्यालय |

सबब उपरोक्त अ.क्र. १ करिता र.रु.५००/- व अ.क्र. २ ते ११ करिता र.रु. ३००/- मोबाईल वापराची अधिकतम मासीक मर्यादा निश्चित करणेस तसेच भविष्यात मनपाची विविध कार्यालये, अधिकारी, नगरसदस्य व कर्मचारी यांस आवश्यकतेनुसार मा.अति.आयुक्त यांचे मान्यतेने मोबाईल सिम सुविधा पुरविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७१/२०१५
दिनांक - २१/०७/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.